**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम**
**प्र.क्र.२ मधील ३ (क ) अन्वये मा.स्थायी समिती**
**विशेषसभा क्रमांक : ०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ११ /०९/२०१९

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**अहमदनगर महानगरपालिकेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्र.क्र.२ मधील ३ (क ) अन्वये मा.स्थायी समिती विशेषसभा** क्र -०४ गुरूवार दि. १२ /०९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृहात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**गुरूवार दिनांक - १२ /०९/२०१९ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८७ | नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.२०७९ अंतर्गत प्रभाग क्र.७ श्रीरामनगर,साईनगर,नवनाथ नगर,समृध्दी पार्क,शांतीधाम,बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. |
| ८८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता मागविण्यात आलेल्या ई- निविदा क्र.२१२४ चा तुलनात्कक तक्ता मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ८९ | फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवी पेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता प्राप्त निविदांबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९० | अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथील पाण्याची मोटर बदलने करीताच्या खर्चाच्या बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त नविन प्रशासकीय इमारत व जुने मनपा कार्यालय मुख्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या भागावर विद्युत रोषणाई करणे करीता खर्चास कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ८७ गुरूवार दि.१२/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.२०७९ अंतर्गत प्रभाग क्र.७ श्रीरामनगर,साईनगर,नवनाथ नगर,समृध्दी पार्क,शांतीधाम,बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.लिफाफा क्र.२ दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.०८/०३/२०१९
२. ऑनलाईन ई-निविदा क्र.- २०७९/सन २०१९-२० दि.०३/०७/२०१९
३. निविदा विक्री कालावधी- दि.०३/०७/२०१९ ते दि.१७/०७/२०१९
४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.१८/०७/२०१९ ते दि.२०/०७/२०१९
५. निविदा उघडण्याचा दिनांक- २२/०७/२०१९
६. कामाची मुदत- ६ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.०७/०८/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि. /ई-निविदा क्र.२०७९ / २०१९-२० | प्रभागक्र.७श्रीरामनगर, साईनगर,नवनाथ नगर, समृध्दीपार्क, शांतीधाम, बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ३१,११,१११/- | मे.बेस्ट कंस्ट्र. अ.नगर | निविदा दरापेक्षा ३.००%जादा | यश कंन्स्ट्र ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांचे दर निविदा दरापेक्षा १.३५% कमी |
| | | | यश कंन्स्ट्र ॲण्ड सप्लायर्स अ.नगर | निविदा दरापेक्षा १.३५% कमी | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.६मध्ये नमुद निविदाधारक यश ंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा,नविदा दरापेक्षा १.३५% इतक्या कमी दराची आहे.सदर निविदाधारकाने व्यापारी लिफाफा उघडल्यापासून ८ दिवसाचे आत रक्कम रू.३१,२००/- रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डि.डि.नं.१९३२६८ दि.२२/०८/२०१९ अ.नगर मर्चट बॅक लि.अ.नगर ) इकडेस जमा केलेला आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवून यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा दरापेक्षा १.३५% कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस्तव सदरचा ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा दरापेक्षा १.३५ टक्के कमी दराची निविदा मान्य करणे योग्य अंतिम मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,निविदा उघडण्याचा दिनांक नमुद नाही.पुर्तता सह फेरसादर करावे.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की,फेरसादर,सोबत पा.नं.२१७ त २१८ वर निविदा उघण्याचा दिनांक

२०/०८/२०१९आहे.मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,रू.५००/- प्रतिज्ञापत्राबाबत विभागाने खात्री करावी विभागाने आक्षेपा बाबत खुलासा केल्यानुसार मा.पृष्ठ क्र.टि-१२ वरील अ प्रमाणे १.३५ टक्के कमी दारची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर उपअभियांता याचा अभिप्राय की,रू.५००/- चे प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे.मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार व मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

मा.सभापती साहेब :- नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.२०७९ अंतर्गत प्रभाग क्र.७ श्रीरामनगर,साईनगर,नवनाथ नगर,समृध्दी पार्क,शांतीधाम,बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.लिफाफा क्र.२ दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.२०७९ अंतर्गत प्रभाग क्र.७ श्रीरामनगर,साईनगर,नवनाथ नगर,समृध्दी पार्क,शांतीधाम,बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.या कामा करीता यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा दरापेक्षा १.३५% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.२०७९ अंतर्गत प्रभाग क्र.७ श्रीरामनगर,साईनगर,नवनाथ नगर,समृध्दी पार्क,शांतीधाम,बोल्हेगांव अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.या कामा करीता यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा दरापेक्षा १.३५% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.मनोज कोतकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ८८ गुरूवार दि.१२/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता मागविण्यात आलेल्या ई- निविदा क्र.२१२४ चा तुलनात्कक तक्ता मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा विभाग

उपरोक्त विषयाबाबत अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिके हद्दिमध्ये निर्माण घनकच-याचे खाजगी यंत्रणेमार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता ई-निविदा मागविण्यात आली होती सदर निविदेमध्ये एकुण खालील प्रमाणे चार निविदेधारकानी सहभाग घेतला होता. १) बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे. २) स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे. ३) स्टर्लिंग टेन्कोलॉजी ॲण्ड सर्व्हिसेस. ४) वॉटर ग्रेस प्रॅाडक्टस नाशिक.

त्यानुसार वरील प्रमाणे चारही निविदेधारकानी तांत्रिक लिफाफ्यामधिल आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केल्यामुळे दि.०७/०९/२०१९ रोजी ई-निविदा क्र.२१२४ बाबत वरील प्रमाणे चार निविदाधारकानी कागदपत्राची पुर्तता केली असल्याने चारही निविदांचे व्यापारी लिफाफे उघडणे बाबत छानणी समितीने शिफारस केली आहे.

त्यानुसार दि.०७/०९/२०१९ रोजी व्यापारी लिफाफे उघडण्यात आले त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदेधारकाचे नाव | निविदा धारकाने निविदेमध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे. | २२४९/- रु प्रति मे.टन |
| २ | स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे. | १६५०/- रु प्रति मे.टन |
| ३ | स्टर्लिंग टेक्नॉलॉजी ॲण्ड सर्व्हिसेस. | १९४४/- रु प्रति मे.टन |
| ४ | वॅाटर ग्रेस प्रॅाडक्टस नाशिक. | १९०८/- रु प्रति मे.टन |

त्यानुसार वरील प्रमाणे चार निविदाधारकानी कचरा संकलन व वाहतुकी करीता निविदेमध्ये प्रति टन खर्चा बाबत नमुद केलेले दरांची तुलना करता स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांनी निविदेमध्ये नमुद केलेले दर १६५०/-रु प्रति मे.टन हे सर्वात कमी आहेत.त्यानुसार स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.या एजन्सीला दराच्या वाटाघाटी बाबत दि.०९/०९/२०१९ रोजी उपस्थित राहणे बाबत व दर कमीकरणे बाबत पत्र दिले.या बाबत सदर एजन्सीने दि.०९/०९२०१९ रोजी मनपास पत्र देऊन त्यांनी नमुद केलेले दर हे बाजार भावाशी मिळते जुळते व योग्य आहेत व त्याच दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शवली आहे व त्यानुसार सदर एजन्सी यापेक्षा कमी दराने काम करु शकत नाही.

अहमदनगर महानगरपालिके मध्ये सध्यास्थितीत कचरा संकलन व वाहतुकी करीता प्रति वर्ष अंदाजे ६९३ लक्ष इतका खर्च येत आहे व तरी सुध्दा शहरात नियमीतपणे दैनंदीन डोअर टु डोअर कचरा संकलन व सार्वजनिक ठिकाणी साठवणुक केलेल्या कच-याचे संकलन व वाहतुक प्राभविपणे करणे शक्य होत नाही.

निविदेमधिल सर्वात कमी दर नमुद केलेली एजन्सी स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांनी १६५०/- रु प्रति मे.टन इतका दर नमुद केले आहे यानुसार कचरा संकलन व वाहतुकीचा वार्षिक खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | एकुण निर्माण होणारा घनकचरा प्रति दिन | अंदाजे १४० मे.टन प्रति दिन |
| २ | एकुण प्रति दिन कचरा संकलन व वाहतुक खर्च | १६५० X १४० = २,३१,०००/- प्रति दिन |
| ३ | एकुण कचरा संकलन व वाहतुक खर्च प्रति वर्ष | २,३१,००० X ३६५ =८४३ लक्ष. |

त्यानुसार एकुण वार्षीक खर्च ८४३ लक्ष इतका अपेक्षीत आहे या मधुन निविदेमध्ये नमुद केल्या नुसार मनपामार्फत वाहन पुरविले जाणार आहे व त्याचे किमान अंदाजे दोन ते सव्वादोन कोटी भाडे मनपास ठेकेदाराच्या देयकातुन वसुल करता येणार आहे.व त्यानुसार सध्या मनपा करीत असलेल्या कचरा संकलन व वाहतुकी पेक्षा कमी खर्चात व प्रभाविपणे १०० टक्के घरोघरी जाउन कचरा संकलन व वाहतुक करणे शक्य होईल.या व्यतिरिक्त सद्यस्थीतीत मनपाचे कचरा संकलन व वाहतुकी करीता ५० ते ५५ कर्मचारी कार्यरत आहे.सदेचे कर्मचारी उपनगरात ज्या ठिकाणी रस्तेसफाई करीता कर्मचारी वर्ग अपुरा आहे त्या ठिकाणी वर्ग करता येतील.

तरी अहमदनगर मनपा हद्दिमध्ये निर्माण होणा-या घनकच-याचे खाजगी यंत्रणेमार्फत संकलन व वाहतुकी करीता प्राप्त झालेल्या ई-निविदेचा तुलनात्मक तक्ता निर्याणास्वत मा.स्थायी समिती कडे सादर.

येणे प्रमाणे प्र.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे

यावर घनकचरा व्य. विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचे अहवालानुसार मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,

१.निविदा क्र.२१२४ मधील प्राप्त ४ निविदाकाराचे तांत्रिक लिफाफा १ बाबत स्क्रीन शॉट प्रस्तावा सोबत दिसुन येत नाही.

२. प्रस्तावा सोबत रू.५००/- स्टॅम्प पेपर प्रतिज्ञापत्र जोडले नाही

३. नस्ती मधील पृष्ठ क्र. अपुर्ण आहेत

४. प्राप्त निविदा कारातील लघुत्तम दर रू.१६५०/- प्रति मेट्रीक टन इतका नमुद केला असून तो दर इतर महानगरपालिकेतील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी मंजूर केलेल्या दरा बाबत माहिती प्रस्ताव सोबत दिसून येत नाही.त्यामुळे प्राप्त निविदा मधील लघुत्तम दर रू.१६५०/- प्रती मेट्रीक टन हे बाजार भावाशी मिळते जुळेते असल्यामुळे वाटाघाटी बाबत दिलेल्या पत्रात नमुद आहे.त्यामुळे घनकचरा विभाग प्रमुख यांनी प्राप्त दराची तुलना बाजार भावाशी व इतर महानगरपालिकेतील दराशी तुलना केल्याची खात्री करूनच विभागाने प्रस्तावित केलेल्या लघुत्तम दरा बाबत निर्णय घेता येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,१.मुलेप यांचे अभिप्रायामधील स्क्रीन शॉट पृष्ठ क्र.१३१ वर आहे (पेज नं नसलयामुळे) आक्षेप नोंदविलेला दिसतो.

२.रू.५००/- चा स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र कोणत्या बाबीबद्दल याचा उल्लेख मु.ले.प.यांनी केला नाही तसेच Tenderdocmntnt मध्ये रू.५००/-च्या प्रतिज्ञाबाबत कुठे उल्लेख किंवा तरतुद आढळून येत नाही.

३. निविदादरांची तुलना इतर मनपाची दराबाबत करणेबाबात अभिप्राय आहेत तथापी सदरचे दर हे घरांची संख्या ,वाहनांची संख्या तसेच कचरा वाहतुक Door to Door व तेथून dumping ground पर्यतचे अंतर व यावर अवलंबून असणार आहे.तरी ही इतर मनपाच्या दराची तुलना करणे बाबत निर्णयाबाबत १ ते ३ मुद्याबाबत मान्यतेस्तव व आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सदर कामाचे स्वरूप असे आहे की याची बाजारात किंमत कळणार नाही.E- tendering ने आलेले दर स्पर्धात्मक आहेत.सबब मान्यतेस्तव स्थायी समितीमध्ये विचारार्थ ठेवावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता मागविण्यात आलेल्या ई- निविदा क्र.२१२४ चा तुलनात्कक तक्ता मंजूरीस्तव ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- विषयाची सविस्तर माहिती सांगा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- अहमदनगर महानगरपालिका हद्दमध्ये कचरा संकलन वा वाहतुक करणे करीता ई - निविदा

मागविण्यात आली होती.त्यामध्ये चार निविदा आपल्याला प्राप्त झाल्या आहेत.त्यामध्ये सर्वात कमी दर आहेत स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांनी १६५०/- रु प्रति मे.टन इतका दर नमुद केले आहेत.

मा.सभापती साहेब :- आपण दर दिले होते का?

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- आपण बेस कॉस्ट आपण दिली नाही.आपला वार्षीक दर आहे.तो आठ कोटी रूपये आहे.त्याअगेंस्ट टेंडर कॉल केले होते.आपण नविन वाहने घेणार आहोत.ती वाहने सुध्दा ठेकेदाराला भाडयाने देणार आहोत.जो पर्यत आपली वाहने येणार नाही तो पर्यत ठेकेदार त्याच्या कडील वाहने वापरणार आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्या वाहनांचे काय झाले.

घनकचरा व्य. विभाग प्रमुख :- अदयाप ठराव झालेला नाही.आपली जेव्हा नवीन वाहने येतील ती ठेकेदाराला भाडयाने देता येईल.आर.टी.ओ.कडून भाडे निश्चीत करून घेतले आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्या कडील वाहने येण्याकरीता चार ते पाच महिने लागली तर.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- तो पर्यत ठेकेदार त्याच्याकडील वाहने उपलब्ध करणार आहे.

मा.सभापती साहेब :- तसे बोलणे झाले आहे का

घनकचरा व्य.विभाग प्रमुख :- हो बोलणे झाले आहे.आपल्या कडील सध्याचे जे काही सुस्थीतील वाहने ठेकेदार भाडयाने घेणार आहे.ठेकेदारास सध्या त्याच्या कडील वाहने वापरावी लागतील,महानगरपालिकेचे वाहने आल्यानंतर ती भाडयाने घ्यावी लागेल.

मा.सभापती साहेब :- आपले ज्यावेळी तीन चार महिन्यानंतर वाहने येतील,आपली वाहने कमी पडल्यानंतर ठेकेदार त्याची वाहने लावणार का?

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- आवश्यकतेनुसार वाहने लावणार.टेंडर मध्ये तसे नमुद आहे.आवश्यकतेनुसार लावण्याची ठेकेदारास मुभा आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे :- करारनामा किती महिन्याचा आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- तीन वर्षाचा आहे.

मा.श्री.सुभाष लोंढे :- आपली वाहने आल्यानंतर काय करणार

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- ठेकेदार भाडेतत्वावर घेणार आहे.त्याचे भाडे तो महानगरपालिकेला देणार आहे.

मा.सभापती साहेब :- कोणकोणत्या ठिकाणचा कचरा संकलन करणार.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- संपुर्ण शहरामधील घरोघरी जावून कचरा संकलन करणे,सार्वजनीक ठिकाणी जो कचरा पडला तो सुध्दा उचलायचा आहे.हॉटेल मधून निर्माण होणारा कचरा सुध्दा उचलणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- किती ट्रीप करणार त्याचें काही आहे का?

घनकचरा व्य.विभाग प्रमुख :- ठेकेदाराने त्याच्या कामाचे वेळापत्रक दिले आहे.सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यत काम करणार आहे.प्रत्येक वाहनावर जी.पी.एस.ट्रॅकिंग बसविण्यास सांगितले आहे.काम सुरू करण्यास १५ ते २० दिवसांचा कालावधी लागणार आहे.त्यामध्ये तो रूट प्लॉन आपल्याला देणार आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- एका वॉर्ड मध्ये किती गाडया मिळणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- सध्या ठेकेदाराचे नियोजन ४५ वाहने लावण्याचे आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- आजच्या पेक्षा कमी गाडया आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- ४५ गाडया प्लस कॉम्पॅक्टर लावणार आहे.कॉम्पॅक्टर मुळे गाडयांच्या खेपा कमी होणार आहे.कॉम्पॅक्टर लावणे ठेकेदारास बंधन कारक आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ठेकेदाराने काम केले नाही तर काय करणार

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- ठेकेदारास दंड करण्याची तरतुद आहे.

मा.सभापती साहेब :- या यंत्रणेवर प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांचे नियंत्रण ठेवा.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- प्रभाग अधिका-यांचे यावर नियंत्रण असेल.

मा.सभापती साहेब :- कोणत्या मार्गा करीता किती वाहनांची आवश्यकता आहे.त्या प्रमाणात गाडया ठेवा मग त्या ६० ठेवा किंवा ८० ठेवा गाडया कमी पडल्या नाही पाहिजे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख :- मार्गाची निश्चीती केल्यानंतर सर्व सदस्यांना त्याची माहिती देण्यात येईल.

मा.श्री.सुभाष लोंढे :- इतिवृत्त कायम करण्याच्या आधी सर्व डाटा आम्हाला दाखवा.

मा.श्री.अविनाश घुले :- वॉर्ड मध्ये कशा प्रकारे सुधारणा होणार याची माहिती दया.

मा.श्री.गणेश भोसले :-नियमांचा भंग केल्यास टेंडर रद्द करण्यात येईल.असे ॲग्रीमेंट मध्ये घ्या.कच-याचा विषय आहे.

मा.सभापती साहेब :- वाहनांची संख्या प्रशासन सांगेल त्यानुसार ठेकेदाराने वाहन पुरविणे ठेकेदारावर बंधनकारक असेल.

मा.श्री.येवले ज्ञानेश्वर :- सदरचा ठेका तीन वर्षा करीता देण्यात यावा.ठेकेदारचे काम समाधान कारक असल्यास पुढील तीन वर्षा करीता मा.आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने पुढील तीन वर्षा करीता कामास मुदत वाढ देण्यात यावी.घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता करता स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांच्या कमी असलेल्या दराच्या निविदेस मान्यता देण्यात यावी.

मा.सौ.विदया खैरे :- भविष्या ठेकेदाराच्या कामागारांना देण्यात येणा-या ई.एस.आय/ई.पी.एफ.च्या सध्याच्या दरामध्ये वाढ झाल्यास,तसेच शासकिय करामध्ये वाढ झाल्यास सदरची वाढीस रक्कम ठेकेदाराच्या मासीक देयका मध्ये समाविष्ठ करण्यात यावी.

जेणे करून कामगारांचे प्रश्न निर्माण होणार नाही. महानगरपालिके मार्फत जी वाहने पुरविण्यात येणार आहे त्या व्यतिरीक्त लागणा-या वाहनांची व्यवस्था ठेकेदारास स्वत: निविदा कालावधी पर्यत करावी लागेल.प्रशासनाने कचरा संकलन व वाहतुक करणे बाबतच्या मार्गाचा आराखडा तयार करून ठेकेदारास दयावा.प्रशासनाने या मार्ग आराखडयाची माहिती सर्व सदस्यांना दयावी.प्रशासनाने तयार केलेल्या आराखडया नुसार ठेकेदाराने काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. कचरा संकलन व वाहतुकीसंबंधी प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांचे नियंत्रण राहिल.याप्रमाणे ठरावा नुसार मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब:-अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता मागविण्यात आलेल्या ई-निविदा क्र.२१२४नुसार स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांनी निविदेमध्ये नमुद केलेले दर १६५०/-रु प्रति मे.टन हे सर्वात कमी असलेल्या दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ठेकेदाराचे काम समाधान कारक असल्यास पुढील तीन वर्षा करीता मा.आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने पुढील तीन वर्षा करीता कामास मुदत वाढ देण्यात येत आहे.भविष्यात ठेकेदाराच्या कामगारांना देण्यात येणा-या ई.एस.आय / ई.पी.एफ.च्या सध्याच्या दरामध्ये वाढ झाल्यास,तसेच शासकिय करामध्ये वाढ झाल्यास सदरची वाढीव रक्कम ठेकेदाराच्या मासीक देयका मध्ये समाविष्ठ करण्यात यावी. महानगरपालिके मार्फत जी वाहने पुरविण्यात येणार आहे त्या व्यतिरीक्त लागणा-या वाहनांची व्यवस्था ठेकेदारास स्वत:निविदा कालावधी पर्यत करावी लागेल.प्रशासनाने कचरा संकलन व वाहतुक करणे बाबतच्या मार्गाचा आराखडा तयार करून ठेकेदारास दयावा. प्रशासनाने या मार्ग आराखडयाची माहिती सर्व सदस्यांना दयावी.प्रशासनाने तयार केलेल्या आराखडया नुसार ठेकेदाराने काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. कचरा संकलन व वाहतुकीसंबंधी प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांचे नियंत्रण राहिल.याप्रमाणे ठरावा नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** १.अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-याचे खाजगी यंत्रणे मार्फत संकलन व वाहतुक करणे करीता मागविण्यात आलेल्या ई- निविदा क्र.२१२४ नुसार स्वयंभु ट्रान्सपोर्ट पुणे.यांनी निविदेमध्ये नमुद केलेले दर १६५०/-रु प्रति मे.टन हे सर्वात कमी असलेल्या दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२.ठेकेदारचे काम समाधान कारक असल्यास पुढील तीन वर्षा करीता मा.आयुक्त साहेब यांच्या मंजूरीने पुढील तीन वर्षा करीता मुदत वाढ देण्यात यावी.

३. भविष्यात ठेकेदाराच्या कामगारांना देण्यात येणा-या ई.एस.आय / ई.पी.एफ.च्या सध्याच्या दरामध्ये वाढ झाल्यास,तसेच शासकिय करामध्ये वाढ झाल्यास सदरची वाढीव रक्कम ठेकेदाराच्या मासीक देयका मध्ये समाविष्ठ करण्यात यावी.

४. महानगरपालिके मार्फत जी वाहने पुरविण्यात येणार आहे त्या व्यतिरीक्त लागणा-या . वाहनांची व्यवस्था ठेकेदारास स्वत: निविदा कालावधी पर्यत करावी लागेल.

५.प्रशासनाने कचरा संकलन व वाहतुक करणे बाबतच्या मार्गाचा आराखडा तयार करुन ठेकेदारास दयावा. प्रशासनाने या मार्ग आराखडयाची माहिती सर्व सदस्यांना दयावी.प्रशासनाने तयार केलेल्या आराखडया नुसार ठेकेदाराने काम करणे ठेकेदारास बंधनकारक राहिल. कचरा संकलन व वाहतुकीसंबंधी प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांचे नियंत्रण राहिल.याप्रमाणे ठरावा नुसार मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.येवले ज्ञानेश्वर उर्फ अमोल शिवाजी सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खैरे विद्या दिपक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ८९ गुरूवार दि.१२/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवी पेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता प्राप्त निविदांबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

संदर्भ :- १. मा.जिल्हा नियोजन अधिकारी ,जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर
यांचे दि.०७/०३/२०१९ चे निधी वितरण बाबत पत्र.
२. फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२०
३. मा.आयुक्त यांची दि.०६/०९/२०१९ची मंजुर टिप्पणी.
४. दि.०६/०९/२०१९ रोजीची खरेदी समिती/वाटाघाटी समितीची बैठक

उपरोक्त संदर्भाकीत विषयानुसार अहमदनगर महरनगरपालिकेचा नवी पेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकररिता मा.जिल्हा अधिकारी यांचेकडे नाविन्यपुर्ण योजनेमधून निधी मागणीकरिता आरोग्य जा.क्र.१९४४ दि.५/३/२०१९ अन्वये १.५ Tesla Refurbished अम.आर .आय.मशिन खरेदीकरिता रक्कम रू.३ कोटी ०५ लक्ष व बांधकाम ए.सी. इतर साहित्य करिता अंदाजे ५० लक्ष असे एकुण रू.३ कोटी ५५ लक्षची मागणी बाबतचा प्रस्ताव नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत मिळणेबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना सादर करण्यात आला होता.सदरच्या प्रस्तावानुसार मा.जिल्हाधिकारी,कार्यालयाकडून रू.३ कोटी ०५ लक्ष निधी वितरीत करणे्बाबतचे पत्र दि.७/६/२०१९ रोजी प्राप्त झाले आहे.त्यानुसार महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगा ाने दि.६/६/२०१९ रोजी ई -निविदा क्र.२०५८ प्रसिध्द करण्यात आली.सदर ई - निविदेमध्ये एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.९/७/२०१९ रोजी एक आठवडयाची प्रथम वेळ मुदतवाढ घेण्यात आली.सदर ई - निविदेचा स्क्रीनशॅट पाहिला असता दोन निविदा प्राप्त झाल्या.तदनंतर दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली.परंतु तांत्रिक कारणांमुळे निविदा बंद माल्यामुळे दि.१८/७/२०१९ रोजी फेर ई -निविदा क्र.२०९० प्रसिध्द करण्यात आली.त्यामध्ये एकच ई -निविदा प्राप्त झाली .तदनंतर सदर फेर ई -निविदेस प्रथम वेळ मुदतवाढ देण्यात आली.त्यामध्ये एकच निविदा प्राप्त झाली.तदनंतर पुनश्च मा.आयुक्त यांचे दि.७/८/२०१९ रोजीच्या मान्यतेनुसार फेर ई - निविदेमध्ये एकही निविदा प्राप्त झाली नसल्यामुळे ७ दिवसांची प्रथम वेळ मुदतवाढ देण्यात आली.या फेर ई - निविदेमध्ये १. मे.कृष्णा डायग्नोस्टिक प्रा.लि.२. मे. लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर३. मे रिदम डायग्नोस्टिक्स प्रा.लि.या तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.छाननी समिती समोर प्राप्त निविदाकारांचे तांत्रिक लिफाफे सादर केले असता असे निदर्शनास आली की,मे.रिदम डायग्नोस्टिक्स प्रा.लि.यांनी तांत्रिक लिफाफयामध्ये व्यापारी लिफाफयाचे दर नमुद केलेले आहेत.त्यांनी रू.४ कोटी ३२ लाख असे दर नमुद केलेले आहेत.तथापि व्यापारी लिफाफयाचे दर तांत्रिक लिफाफयात सादर केल्याने ई - निविदेच्या अटी व शर्तीनुसार ते पात्र ठरत नाहीत.त्यामुळे उर्वरीत दोन निविदाकार संस्था १. मे.कृष्णा डायग्नोस्टिक प्रा.लि. २. मे. लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांचे कागदपत्रांची छाननी करून

त्यांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात आले.प्राप्त झालेल्या तीनही निविदाकारांचे दर खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकार संस्थेचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | . मे.कृष्णा डायग्नोस्टिक प्रा.लि. | रू.४ कोटी ०२ हजार फक्त |
| २ | मे. लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर | रू.३ कोटी ७० हजार फक्त |
| ३ | मे रिदम डायग्नोस्टिक्स प्रा.लि. | रू.४ कोटी ३२ हजार फक्त |

प्राप्त झालेल्या दराबाबत तीनही निविदाकारांना कल्पना देण्यात आली व लघुत्तम दर असलेले मे.लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांचेशी दि.६/९/२०१९ रोजी खरेदी समिती/वाटाघाटी समितीने वाटाघाटी केली असता मे.लोगमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर या संस्थेने (संपुर्ण करासहीत जी.एस.टी.महानगरपालिका ,इत्यादी) रू.३ कोटी ३५ लक्ष निविदेचा दर करणेबाबत सहमती दर्शवून तसे खरेदी समिती /वाटाघटी समिती समोर पत्र दिलेले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मुळ निविदेकरिता रू.३ कोटी ०५ लक्ष निधी प्राप्त झालेला असून त्युनसारच निविदेची किंमत ठरविण्यात आलेली आहे.तथापि,प्राप्त झालेले दर हे रू.३ कोटी ३५ लक्ष असून रू.३० लक्ष (+०९.८४%) अधिकचे आहे.शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग दि.१ डिसेंबर२०१६मधील४.४.३.१मधील कलम (ब) अन्वये दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली किंमत यामध्ये (-) २० टक्के(+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहिल.या किंमती श्रेणीमध्ये (price Band)किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी असे नमुद केलेले आहे.

तथापि मा.जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचेकडून प्राप्त दि.७/३/२०१९ च्या नाविन्य पुर्ण योजनेअंतर्गत सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेकरीता रक्कम रू.३ कोटी ०५ लाख मंजुर झालेले आहेत.याकामी हा निधी अपुरा पडणार असून कमी पडणारा निधी माहे नोव्हेंबर अखेर प्रस्तावीत केल्यास निधी देणेबाबत पत्रामध्ये मुद्या क्र.६ मध्ये उल्लेख केलेला आहे.त्याअनुषंगाने मा.जिल्हाधीकारी कार्यालयाकडे अधिकची मागणी करता येईल.तुर्त रू.३० लक्ष बाबत अधिकच्या रक्कमेबाबत तरतुद मनपा दवाखान्यांसाठी औषधे व उपकरणे या लेखाशिर्षामधून दर्शविता येईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता गोर गरीब गरजू नागरिकांना लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून देणे व चाचण्याचे दर निश्चीत करणे गरजेचे आहे.अहमदनगर शहरामध्ये खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांकडे चौकशी केली असता एम.आर.आय.सेंटरमध्ये रू.२५००/- ते रू.५०००/- पर्यत चाचण्यांचे दर प्रति रूग्ण असे आहेत.तथापी महानगरपालिकेचे दर त्यापेक्षा कमी असलेस गोर गरीब रूग्णांना माफक दरामध्ये सेवा उपलब्ध करून देणे,शक्य होईल.करिता मे.लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांची निविदा मान्य करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेकरिता ठेवणेस व सेवेचे दर निश्चीत करणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे लिपीक आरोग्य विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवणेस व प्रति रूग्ण चाचण्यांचे दर निश्चित करणेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्राप्त झालेल्या निविदाकाराचे निविदेतील नमुद केल्याची दराची स्क्रन शॉट जोडले नाही.

वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग यांचा शासन निर्णय दिनांक १३/८/१९ व ३१/८/१९मधील तरतुदीनुसार ,सदर यंत्र सामग्री किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची वैद्यकीय अधिकारी यांनी खात्री करावी.सदरची यंत्र सामग्री किमान तीन उत्पादक /पुरवठादार यांचे कडून निविदा प्राप्त बाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी खात्री करावी

मुख्यलेखापरिक्षक यांचे मुळ टिपणीतील दिनांक २/३/१९ चे १ ते५ अभिप्रायाचे अवलोकन करावे.विभागाने प्रस्तावीत केले प्रमाणे दोन निविदा पात्र असल्याने वैद्यकीय शिक्षण वऔषध द्रव्य विभाग यांचे शासन निर्णयाप्रमाणे किमान निविदा प्राप्त होत नसल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त नाही.त्यामुळे विभागाने पुर्ततासह फेर सादर करावे.संपुर्ण नस्तीवर पेजींग अपुर्ण आहे.पुर्तता करावी.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर,मा.मुख्यलेखाधिकारी यांनी दि.९/९/१९ रोजी नोंदविलेल्या आक्षेपाबाबत.संदर्भीय विषयानुसार सादर करण्यात येते की,अहहमदनगर महानगरपालिकेच्या नवीपेठे दवाखाना येथे एम.आर.आय .मशिन १.५ Tesla Refurbished टर्न की प्रकल्प राबविणेकामी प्राप्त तीन निविदांबाबत निर्णय घेण्यासाठभ प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.त्या संदर्भात मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी नोंदाविलेल्या आक्षेपाबाबत खालील प्रमाणे फेरसादर करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.१:-** प्राप्त झालेल्या निविदामाराचे निविदेतील नमुद केलेल्या दराची स्क्रिन शॅट जोडले नाही
खुलासा :- दराचे स्क्रिन शॅट जोडले आहेत.

**मुद्दा क्र.२ :-** वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग यांचा शसन निर्णय दि.१३/८/१९ व दि.३१/०८/२०१९ मध्ये तरतुदीनुसार सदर यंत्र सामुग्रीची किंमत बाजारभाव पेक्षा जास्त नसल्याची वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी खात्री करावी.

**खुलासा :-** दि.१३/८/१९ चे शासन निर्णयामध्ये (३.०.T) मशिनचे दर टर्न की प्रकल्पाकरीता रू.१३ कोटी २० लक्ष असे दर नमुद करण्यात अलेले आहेत.तसेच दि.२१/२/२०१८चे शासन निणूयामध्ये नमुद केले नुसार (१.५.T.) टर्न की प्रकल्पाकरीता रू.७ कोटी ५० लक्ष असे दर नमुद करण्यात आलेले आहेत. दि.३१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामध्ये मुददा क्र.३ नुसार दि.१/१२/२०१६ शासन निर्णय क्र. भांखस -२०१४ /प्र.क्र.८२/भाग III /उदयोग ४ यामधील परिच्छेद क्र.३.१.२. किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा या शीर्ष काखालील किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मंजूर देण्यात यईल,असे नुमुद केलेले आहे.उपरोक्त सर्व तरतुदींचा विचार करता प्रस्तावामध्ये नुमुद केलेले दर हे निश्यतपणे जास्तीचे नाही असे दिसुन येते

मुद्दा क्र.३ सदरची यंत्र सामुग्री किमान तीन उत्पादन / पुरवठादार यांचेकडून निविदा प्राप्त बाबत वैदद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी खत्री करावी.

खुलासा :- खत्री करण्यात आलेली आहे.तयानुसार वेळोवेळी ई - निविदा प्रसिध्द कण्यात आलेल्या आहेत व निविदेला प्रतिसाद म्ळणून तीन निविदा प्राप् झालेल्या आहेत

मुद्दा क्र.४ मुख्यलेखापरिक्षक यंचे मुळ टिप्पण्णीतील दिनांक २/३/२०१९ चे १ ते ५ अभिप्रायाचे अवलोकन करावे. विभगाने प्रस्तावीत केले प्रमाणे दोन निविदा प्राप्त असल्याने वैद्यकीय शिक्षण व औष्ज्ञध द्रव्या विभाग यांचे शासन निर्णयाप्रामणे किमान निविदा प्रप्त होत नसल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही.त्यामुळे विभागाने प्रर्ततासह फेरसादर करावे.

खुलासा :- मुछ्दा क्र.२ मध्ये य संदर्भातील सर्व तरतुदींचे विश्लेषण करण्यात आलेले आहेत.सदरच्या शासन निर्णयातील दि.१/१२/२०१६ शासन निर्णय क्र.भांखस -२०१४ /प्र.क्र.८२/भाग III /उदयोग ४ या शासन निर्ण यामध्ये खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहेत.परिच्छेद क्र.३.१.२ किंमतीचा अंदाज आणि किंमतीचा वाजवीपणा ३.१.२.१ किंमतीचा अंदाज :-

खरेदी प्रक्रिया ही अंदाजित किंमत आण त्यानंतर प्रत्यक्ष दयावी लागणा-या किंमती भोवती फिरत असते.दरांची /किंमतीचा अचूक अंदाज हा पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या देकरांच्या वाजवीपण निश्चित आणि स्थापित करण्यासाठी आवश्य असतो. त्यामुळे दर/किंमत हे वास्तव,वस्तुनिष्ठ ,बाजारा किंमतीनुसार आण व्यावसायिक पध्दतीने काढण्यात यावेत.अंदाजित किंमत आण प्रत्यक्ष दयावी लागणारी किंमत यामध्ये खुप मोठी तफावत असून सशकणार नाही,यावर भर देण्यात यावा.खरेदीची वास्तविक किंमत यामध्ये जास्त तफावत असल्यास ,खेरेदीदार विभागाने नव्याने निविदा काढणे आवश्यक राहिल.त्यानंतरही त्यामध्ये तफावत आढळल्यास,संबंधिकत खरेदीदार विभागाने एक उच्चस्तर प्रधिका-याची मान्यता घेण्यात यावी.

खरेदीदार विभागांनी वर्षभरात लागणा-या ख्रेदीचे नियोजन शक्यतो त्या वर्शाच्या ३१ मे पर्यत पुर्ण करावे अनावश्यक खरेदी टाळण्यातसाठी खरेदीदार विभागाने तिमाही किंवा सहामाही आढावा घेवून आवश्यकतेनुसार मिमाही किंवा सहामाही खरेदी करावी.

निविदांच्या बाबतीत,"निविदा अर्ज"ची किंमत ही अंदाजित खर्चाच्या आधारावर निश्चत करण्यात येते.र्दिा अर्जासोबत निविदा किंमती/शुल्क व वयाना रक्कम सेबत जोडलेल्या परिशिष्ट ८ मधील तक्त्यांनुसार निश्चत करण्यात यावे आणि निविदाकारांकडून प्राप्त झालेले निविदा किंमत/शुक्ल हे योग्य लेखाशिर्षा खाली जमा करण्या ात यावे.४.४.३.१निविदा कालावधीस मुदतवाढ

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक अहे.तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यसास संबंधिकत खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ दयावी.अश्ी मुदतवाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास असल्सास दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ दयावी.त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येवू नये

निविदा प्रक्रिया राबवितांना खालीलप्रमाणे परिस्थिती उदभवल्सास पुढे नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

अ. तीन किंवा त्यापेक्षा अधिक निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्सास त्सावर खरेदी विभागास पुढे जाण्यास मुभा राहिल.

ब. दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यमध्ये (-) २० टक्के (+) १० टक्के तफावत असल्यसास ती मान्य करण्यास खरेदीदार विभगास मुभा राहिल.यसा किंमती श्रेणीमध्ये Price Band किंमती न आल्सास फेरनिविदा काढावी.

क. एकही नाही अथवा एकच निविद तांत्रिकदृष्टय पात्र ठरल्यास पुनर्निविदा काढण्यात यावी.

रूपये दहा लाखापेक्षा कमी रकमेची निविदा असल्सास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी

कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर,खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यांनतर देखील ) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्सासह पुढे जाण्याचा निर्णय घेवू

शकेल व त्यासाठीसुसाध्य कारणे नमुद करेल अशा प्रसंगी किंमतीच्य वाजवीपणाची खात्री कण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल.
शसन निर्णयाच्या वरील तरतुदींचा विचार केला असता दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असल्याने त्यांचे दर उघडून लघुत्तम निविदेस मान्यता देणकामी प्रस्ताव नियमाप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.
**मुद्दा क्र.**५ संपुर्ण नस्तीवर पेजीग अपर्ण आहे.पुर्तता करावी.
खुलासा :- पुर्तता करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे मुददेनिहाय आक्षेपाबाबत खुलाश्यांचा विचार करून मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणे उचित राहिल,अस मत आहे.
यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,वेदयकीय शिक्षण व औषध दृव्या विभागा दिनांक दि.२१/२/१८, दि.१३/८/१९ दि.३१/८/१९ दि.१९/६/१८ मधील विहीत केल्याप्रमाणे किमान तीन उत्पादक /पुरवठादार यंाज कडून तीन निविदा प्राप्त होवू शकतील याबाबत दैदयाकीय आरोग्यधिकारी यांनी खुलासा केला असून प्रस्तावती अ व ब प्रमाणे मान्येतेस्तव
यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,विभागाचा अहवाल व मुलेप यांचे अभिप्रायानुसार उपरोक्त अ मान्यातेस्तव व पुढील आदेशार्थ सदर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्थायी समितीपुढे ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवी पेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता प्राप्त निविदांबाबत ऑफिस रिपोर्ट.
मा.श्री.गणेश भोसले :- सविस्तर माहिती सागां.
वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या कडे मा.आयुक्त यांचा चार्ज असतांना.त्यांनी आपल्याकडून प्रस्ताव घेतला होता.एम.आर.आय.जे टेक्नीक आहे .डी.पी.टी.सी.मधून रू.३ कोटी ५ लक्षाचा निधी पाठविलेला आहे.मुळ प्रस्ताव ३ कोटी ५५ लक्ष रूपयांचा आहे.मशीन ची कींमत ३ कोटी ५लक्ष असुन बांधकाम व इतर खर्चा करीता रू.३०लक्ष आपल्याला निधी कमी आलेला आहे.परंतु त्यात त्यांनी म्हटले आहे की,जर आणखी निधीची आवश्यकता लागली पुर्तता केली जाईल.
मा.सभापती साहेब :- प्रस्तावामध्ये आपण नमुद केले आहे की,एकुण प्रकल्प कार्यान्वीत करणेकरीता ३ कोटी ५ लाख मंजुर झाले आसून उर्वरित कमी पडणा-या निधी चा प्रस्ताव तयार करून मंजूरी करीता पाठविण्यात यावा.
वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- कमी पडणा-या निधीचा प्रस्ताव करून पाठविण्यात येईल.
मा.गणेश भोसले :- या मशिन मध्ये कशा कशाच्या तपासण्या होतील.
वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- या मशिनमध्ये ब्रेन,मणके,अपघात झाल्यानंतर च्या एम.आर.आय. चे निदान होणार आहे.या संस्थेचे ब-याच ठिकाणी युनिट आहेत.विखे पाटिल

मेडीकल कॉलेज मध्ये सुध्दा याच संस्थेचे युनिट आहे.या संस्थेची इच्छा आहे की,आमच्या संस्थेस चालविण्याकरीता दयावे.सर्व स्टाफ आमच्या संस्थेचा राहिल.

मा.श्री.सुभाष लोंढे :- याची शुल्क किती ठरविणार आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- शुल्क आपल्याला ठरवायचे आहे.मी बाकी ठिकाणचे दर आणले आहेत.एम.आर.आय.ब्रेन रू.३०००/- पर्यत बाहेर दर आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- या दरापेक्षा ५० टक्के दर करा.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- ५० टक्के् खुप कमी होईल,याचे लाईट बिल ४ लाख रुपये महिन्याचे असेल.आनंदऋषी हॉस्पीटल मध्ये सुध्दा रू.२०००/- दर आहे.आपल्याकडे आपला दर रू.१५००/- ते १६००/- ठेवण्यात यावा.आपल्याला मेंटेनन्स खर्च निघेल.

मा.श्री.गणेश भोसले :- विखे पाटिल मेडिकल कॉलेज येथील दर किती आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- विविध चाचण्यांसाठी दर आहेत.मेंदुचा एम.आर.आय. रू.२५००/-, मेंदु स्क्रीनींग रू.१५००,मेंदु कॉण्ट्रास्ट सहित रू .५०००/-,मेंदु एन्जीओग्राफी सहित रू.५०००/- ,मेंदु व्हेनोग्राफी सहिती रू.५०००/-,डोळा (orbit) ३०००, सर्व्हाईकल स्पाईन रू.२५००/- एल.एस स्पाईन रू.२५००/-.शोल्डर जॉईन्ट व इतर सर्व एल.बो,रीस्ट,हिप,थाय,नि,ॲकल,फुट प्रत्येकी रू.३०००/- ,एम.आर.सी.पी.रू.४०००/- कुठल्याहि अवयवाचा कॉन्ट्रास्ट रू.२५००/- फिटयुलोग्राम रू.४०००/-,स्क्रीनींग रू.१०००/- ,स्पाईन व संपुर्ण स्पाईन स्क्रिनींग रू.५०००/-,स्पाईन व सिंगल स्पाईन स्क्रिनींग रू.३५००/- ,स्पेक्ट्रोस्कोपी रू.५०००/-ब्रॅकीयल प्लेक्सेस रू.४०००/-,पोटाचा एम.आर.आय.रू.५०००/- ,पेलव्हीस रू.५०००/-,ब्रेस्ट रू.४०००/-,हात (आर्म ) रू.३०००/-,मान रू,३०००/- ,एम.आर.आय.प्रोस्टेट,रू.३०००/-,असे विविध चाचण्यांसाठीचे दर आहेत.

मा.सभापती साहेब :- या दराच्या ६० टक्के करण्यात यावा.

मा.गणेश भोसले :- कोणत्या जागेमध्ये करणार आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- नविपेठ दवाखाना येथील जागा आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- या ठिकाणी पार्कीग चा प्रश्न आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- युनिट २४ तास चालू राहिल.

मा.श्री.गणेश भोसले :- फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवीपेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता मे.लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांची लघुत्तम दराच्या निविदेस मान्यता देण्यात यावी.कमी पडणा-या रू.३० लक्ष निधी करीता प्रस्ताव तात्काळ सादर करावेत.

मा.श्री.अविनाश घुले :- एम.आर.आय.सेंटर विविध चाचण्यांचे दर विखे पाटील मेडीकल कॉलेज,विळद येथील असलेल्या दरा च्या ६० टक्के ठेवण्यात यावेत जेणे करून गोर गरीब जनतेला याचा मोठा फायदा होणार आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवीपेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता मे.लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांची लघुत्तम

दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.कमी पडणा-या रू.३० लक्ष निधी करीता प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. एम.आर.आय.सेंटर विविध चाचण्यांचे दर विखे पाटील मेडीकल कॉलेज,विळद येथील सध्याच्या प्रचलित असलेल्या दरा च्या ६० टक्के ठेवण्यात यावेत जेणे करून गोर गरीब जनतेला याचा मोठा फायदा होणार आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** १) फेर ई - निविदा क्र.२१२० सन २०१९-२० अहमदनगर महानगरपालिकेच्या नवीपेठ दवाखाना येथे १.५ Tesla Refurbished एम.आर.आय.मशीन (Turn key projeet) कार्यान्वीत करणेकरिता मे.लोकमान्य हॉस्पीटल मेडीकल स्टोअर यांच्या लघुत्तम दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रकल्पा करीता कमी पडणा-या रू.३० लक्ष निधी करीता मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचे कडे नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत अतिरीक्त मागणीचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

३) प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर एम.आर.आय.करिता विविध चाचण्यांचे दर मेंदुचा एम.आर.आय. रू.१५००/-, मेंदु स्क्रीनींग रू.९००,मेंदु कॉण्ट्रास्ट सहित रू .३०००/-,मेंदु एन्जीओग्राफी सहित रू.३०००/- ,मेंदु व्हेनोग्राफी सहिती रू.३०००/-,डोळा (orbit) १८००, सर्व्हाईकल स्पाईन रू.१५००/- एल.एस स्पाईन रू.१५००/-.शोल्डर जॉईन्ट व इतर सर्व एल्बो,रीस्ट,हिप,थाय,नि,ॲकल,फुट प्रत्येकी रू.१८००/- ,एम.आर. सी.पी. रू.२४००/- कुठल्याहि अवयवाचा कॉन्ट्रास्ट रू.१५००/- फिस्टीलोग्राम रू.२४००/-,स्क्रीनींग रू.६००/-, स्पाईन व संपुर्ण स्पाईन स्क्रिनींग रू.३०००/-,स्पाईन व सिंगल स्पाईन स्क्रिनींग रू.२१००/-, स्पेक्ट्रोस्कोपी रू.३०००/-ब्रॅकीयल प्लेक्सेस रू.२४००/-,पोटाचा एम.आर. आय. रू.३०००/-, पेलव्हीस रू.३०००/-,ब्रेस्ट रू.२४००/-,हात (आर्म ) रू.१८००/-, मान रू,१८००/-, एम.आर.आय.प्रोस्टेट,रू.१८००/- असे विविध चाचण्यांसाठीच्या प्रति व्यक्ती एम.आर.आय स्कॅन दरास हि सभा मान्यता देण्यात येत आहे.

ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी

सुचक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ९० गुरूवार दि.१२/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथील पाण्याची मोटर बदलने करीताच्या खर्चाच्या बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

संदर्भ- १. मा. महापौर यांचे दि.२६/०६/२०१९ रोजीचे पत्र

२.विदयुत विभागातील वायरमन शेख यूनूस खानसाब दि.२५/६/२०१९रोजीचा पाहणी अहवाल

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, दि.२५/०६/२०१९ व दि.२६/०६/२०१९ रोजी सदरची मा. महासभा व मा.स्थायी समितीची बैठक विचारात घेवून मा. महापौर यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे मोटार खरेदी करून पाणी भरण्याचे काम चालू केले आहे. तसे पत्र देखील मा. महापौर यांनी दिलेले आहे. त्यामुळे सदरचे प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी मिळणेस व त्यास खर्च रक्कम रूपये १३,६४२/- एवढी रक्कम अदा करणेस मंजुरी मिळणे विषयी विनंती आहे.

लेखाशिर्षक- विदयुत साहित्य खरेदी सन २०१९-२० पान नं.५१/२३

तरतूद - ७५०००००/-

मागील खर्च- ५९१८७१२/-

प्रस्तावीत खर्च- १३६४२/-

एकूण खर्च- ५९३२३५४/-

शिल्लक तरतूद- १५६७६४६/-

येणेप्रमाणे विदयुत विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. अधिकारी यांची प्रस्तावार लेखाशिर्षमधील तरतूद स्वाक्षरी घेतली नाही वारवांर सुचना करूनही इले. विभाग प्रमुख जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात. त्रुटीची पूर्ततासह ठेवाव.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा. मुख्यलेखापरिक्षक यांची अभिप्राय की, उदयोग उर्जा विभागाचा शासन निर्णय १ डिसेंबर २०१६ मधील ३.२.३ प्रमाणे कार्यवाही करणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा. उपायुक्त (सा.) यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे कार्योत्तर मंजुरी करीता पाठविण्यात उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

चर्चा :-

मा.सौ.संध्या पवार :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथील पाण्याची मोटर बदलने करीताच्या खर्च रक्कम रूपये १३,६४२/- रकमेच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथील पाण्याची मोटर बदलने करीताच्या खर्च रक्कम रूपये १३,६४२/- रकमेच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ९१ गुरूवार दि.१२/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त नविन प्रशासकीय इमारत व जुने मनपा कार्यालय मुख्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या भागावर विद्युत रोषणाई करणे करीता खर्चास कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभाग

तुलनात्मक तक्ता

कामाचे नांव- अहमदनगर महानगरपालिकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त नविन प्रशासकीय इमारत व जुने मनपा कार्यालय मुख्य रस्त्याची बाजूस असलेल्या भागावर विदयुत रोषणाई करणे बाबत

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदा रक्कम | टक्केवारी कमी | टक्केवारी जास्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रोकडे सीडी सिस्टीम ॲण्ड केटर्स , अहमनगर | २५०००/- | - | २६७००/- | -- |
| २ | न्यू बालाजी मंडप, अहमदनगर | २५०००/- | -- | २७८००/- | -- |
| ३ | शाह डेकोरेटर्स, अहमदनगर | २५०००/- | २४५००/- | -- | निविदा दरापेक्षा कमी |

वरील कामाचे दराचा तुलनात्मक तक्ता पाहता त्यामध्ये श्री. शाह डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे कामाबाबतचे दर सर्वात कमी म्हणजे निविदा दरानुसार आहेत. तरी सदरचा तुलनात्मक तक्ता मंजूरीस्तव सविनय सादर. /अ

येणेप्रमाणे विदयुत विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेप्रमाणे शाहा डेकोरटेर्स , अहमदनगर यांचे लघुत्तम दराबाबत अ प्रमाणे उचित निर्णय घेता येईल. ठेकेदार वाटाघाटीसाठी बोलवणे उचित राहील.

यावर विदयुत विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर दि.२५/०६/२०१९रोजी काम पार पाडणेबाबतआदेश प्राप्त झाले असुन त्याप्रमाणे तातडीने प्रकरण तयार करून त्यास मंजुरी घेतलेली आहे व त्याप्रमाणे दि.२९/६/२०१९ व ३०/६/२०१९ हे दोन दिवस मनपाच्या इमारतीवर विदयुती करण करणेत आले होते. त्यामुळे सदयस्थितीत पार पडलेल्या कामा बाबत काय वाटाघाटी करणार.कामाची तातडी पाहता करून घेतलेल्या कामास कार्योत्तर मंजूरी अभिप्रेत आहे.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, इले. विभाग प्रमुख यांचें खुलाशाप्रमाणे मागील पृष्ठ क्र.२ मधील अ बाबत विभागाने खात्री कडून उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा, कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समिती कडे मंजुरीस्तव पाठविण्याच्या अधिन राहून मान्यता देणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सौ.संध्या पवार :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त नविन प्रशासकीय इमारत व जुने मनपा कार्यालय मुख्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या भागावर विद्युत रोषणाई करणे करीताश्री. शाह डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दरास कार्योत्तर मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या १६ व्या वर्धापन दिना निमित्त नविन प्रशासकीय इमारत व जुने मनपा कार्यालय मुख्य रस्त्याच्या बाजूस असलेल्या भागावर विद्युत रोषणाई करणे करीताश्री. शाह डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दरास कार्योत्तर मंजूरीस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका